आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२ फेब्रुवारी २०२५ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- आदिवासीबहुल भागांमधलं सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक मागसलेपण दूर करणं सर्वांत मोठं आव्हान असून सरकार त्यासाठी प्रयत्नशील असल्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं प्रतिपादन
- गेल्या महिन्यात वस्तू आणि सेवा कर संकलन एक लाख ९५ हजार कोटी रुपयावर
- भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या टी-२० क्रिकेट मालिकेतला पाचवा सामना मुंबईत सुरु / नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा इंगलंडचा निर्णय

**आणि**

- महिला क्रिकेटमध्ये, 19 वर्षांखालच्या टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत दक्षिण आफ्रिकेवर ९ गडी राखून मात करत भारतानं पटकावलं विजेतपद

**<><><><><>**

आदिवासीबहुल भागांमधलं सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक मागसलेपण दूर करणं सर्वांत मोठं आव्हान असून सरकार त्यादृष्टीने सातत्याने प्रयत्न करत आहे, असं प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी  यांनी केलं. नागपूर मध्ये एम्स इथं महाराष्ट्र आरोग्य  विज्ञान विद्यापीठ आणि  अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेच्या वतीने आयोजित फिस्ट २०२५ या परिषदेच्या

उद्धाटनावेळी गडकरी आज बोलत होते. सेवा आणि उत्पादन क्षेत्राचं जीडीपीमधलं योगदान वाढवण्यासाठी सरकारनं दुर्गम भागांना प्राधान्य दिलं आहे, असं गडकरी म्हणाले. आदिवासीबहुल भागाच्या सर्वसमावेशक विकासासाठी रोजगाराच्या संधी निर्माण कराव्या लागतील, त्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज असल्याचं गडकरी म्हणाले.

या परिषदेचा समारोप मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थितीत झाला. आदिवासींच्या आरोग्याच्या समस्या दूर करणं केवळ भारतच नाही तर जगाच्या दृष्टीने महत्वाचं आहे, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. नागपूर  शहर आदिवासी राजानं स्थापन केलेलं असल्यामुळे ही परिषद या शहरात होणं याला महत्व आहे, असंही ते म्हणाले. आदिवासींची पारंपरिक उपचार पद्धती आणि आधुनिक वैद्यकीय कौशल्याचा संगम करूनच आदिवासींपर्यंत आरोग्य सेवा निटपणे पोहोचवता येतील असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

महानुभाव पंथाच्या राज्यातल्या सर्व प्रमुख श्रद्धास्थळांचा विकास करायचा संकल्प सरकारनं केला असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं. नांदेड जिल्ह्यातल्या हदगाव इथल्या श्रीकृष्ण देव उखळाई मंदिराच्या नवपर्व आणि कलशारोहण सोहळ्यात ते आज बोलत होते.

चक्रधऱ स्वामी आणि त्यांच्या अनुयायांनी विपरित परिस्थितीत धर्म  रक्षणाचं कार्य केलं, असं मुख्यमंत्री म्हणाले. सरकारनं महानुभाव पंथाच्या अनेक मंदिराचा विकास केला आहे, तसंच रिद्धपूर पांचाळेश्वर, जाळीचा देव,

गोविंदप्रभू देवस्थान या ठिकाणीही संवर्धनाचं काम सुरू आहे, असं फडनवीस यांनी सांगितलं. यावेळी माहूर पिठाधीश कवीश्वराचार्य माहुरकर बाबा यांच्यासह परिसरातील मठाधिपती उपस्थित होते.

**<><><><><>**

भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत असून अमेरिकी डॉलर वगळता इतर परदेशी चलनांच्या तुलनेत भारतीय रुपयाची घसरण होत नाही, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी स्पष्ट केलं आहे. २०२५-२६ या वर्षाचा अर्थसंकल्प काल संसदेत सादर झाल्याच्या पार्श्वभूमीवर वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत त्या बोलत होत्या.

देशातल्या प्रामाणिक करदात्यांमुळे अर्थव्यवस्थेला मोलाचं योगदान मिळत असून यंदाचा अर्थसंकल्प तयार करताना त्यांच्याकरता करांमधे सवलत द्यायचं उद्दिष्ट होतं, असं त्या म्हणाल्या. करआकारणी सुलभ आणि सोपी असावी, त्यामुळे करभरणा प्रामाणिकपणे करण्याला प्रोत्साहन मिळतं, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

जानेवारी २०२५ या महिन्यात एक लाख ९५ हजार कोटी रुपये वस्तू आणि सेवा कर महसूल जमा झाला आहे. जानेवारी २०२४ च्या तुलनेत या महिन्यात कर महसूलात १२ पूर्णांक ३ दशांश टक्के वाढ झाली आहे. या महिन्यात केंद्राचं वस्तू आणि सेवा कर संकलन ३६ हजार ७७ कोटी रुपये

आणि राज्याचं वस्तू आणि सेवा कर संकलन ४४ हजार ९४२ कोटी रुपये इतकं आहे. एकात्मिक वस्तू आणि सेवा कर संकलन १ लाख कोटी रुपये तर उपकर संकलन १३ हजार ४१२ इतकं आहे.

**<><><><><>**

देशभरात आज वसंत पंचमी साजरी होत आहे. या दिवशी विद्येची देवता सरस्वती देवीची पूजा केली जाते, तसंच वसंत ऋतूचं स्वागत करून निसर्गातील नवनिर्मितीचा उत्सव साजरा केला जातो.

शिक्षण आणि ज्ञानाचं महत्व सांगणारा तसंच समृद्धी आणि आनंदाचा उत्सव साजरा करणारा हा दिवस असून सर्व देशवासियांना शुभेच्छा देत असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी  मुर्मू यांनी समाजमाध्यमावर लिहिलं आहे. लवकरच भारत जागतिक स्तरावर ज्ञानाचं केंद्र म्हणून उदयाला येवो अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त केली आहे.

प्रधानमंत्री मोदी यांनीही समाजमाध्यमावर देशवासियांना वसंतपंचमीच्या शुभेच्छा  दिल्या आहेत.

**पंढरपुरा**त  आज वसंत पंचमीच्या मुहूर्तावर विठ्ठल-रुक्मिणीचा विवाह सोहळा साजरा झाला. यावेळी रुक्मिणीच्या मूर्तीला शुभ्र वस्त्र आणि मोत्याचे अलंकार घातले होते. सोहळ्यानंतर सर्व भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

**<><><><><>**

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या टी-२० क्रिकेट मालिकेतला पाचवा आणि शेवटचा सामना आज मुंबईत वानखेडे सेटेडिअमवर होत आहे. इंगलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.
या मालिकेत भारतानं ३-१ अशी विजयी आघाडी घेतली आहे. या टी-२० मालिकेनंतर दोन्ही संघांमध्ये तीन एकदिवसीय सामने होणार आहेत.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमध्ये 19 वर्षांखालच्या टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत, अंतिम सामन्यात भारतानं दक्षिण आफ्रिकेवर ९ गडी राखून दणदणीत विजय मिळवत, विश्वचषकावर आपलं नाव कोरलं.

प्रथम फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेचा संघ अवघ्या ८२ धावात गारद झाला. भारताच्या गोंगदी त्रिशानं सर्वाधिक तीन गडी बाद केले. तर पारुनिका सिसोदिया,आयुषी शुक्ला आणि वैष्णवी शर्मा यांनी प्रत्येकी दोन आणि शबनम शकिल हिनं एक गडी बाद केला. विजयासाठी ८३ धावांचं लक्ष्या भारतानं एका गड्याच्या बदल्यात बाराव्या षटकातच पार केलं. गोंगदी त्रिशानं नाबाद ४४, तर सानिका चाळकेनं नाबाद २६ धावांची खेळी करत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं. गोंगदी त्रिशा या सामन्यातली, तसंच स्पर्धेतली सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली.

**<><><><><>**

देहरादून इथं सुरू असलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत मध्य प्रदेशाच्या आशी चौकसे हिनं महिलांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन नेमबाजी प्रकारात सुवर्ण पदक जिंकून राष्ट्रीय विक्रम मोडित काढला.

आशीने २०२३च्या हांगझोऊ आशियाई क्रीडा स्पर्धेत ५० मीटर रायफल थ्री पोझिशन्स प्रकारात रौप्य पदक पटकावलं होतं.

दरम्यान, या क्रीडा स्पर्धेत संरक्षण सेवा दलं पहिल्या स्थानावर, कर्नाटक दुसऱ्या स्थानावर असून महाराष्ट्र तिसऱ्या स्थानावर आहे.

<><><><><>

सांस्कृतिक मंत्रालयानं आकाशवाणीच्या सहकार्यानं आज नवी दिल्लीत आकाशवाणी भवन इथं 'हर कंठ में भारत' हा विशेष शास्त्रीय संगीत कार्यक्रम सुरू केला. हा कार्यक्रम आजपासून १६ फेब्रुवारीपर्यंत दररोज २१ आकाशवाणी केंद्रांवरून सकाळी साडेनऊ ते १० वाजेपर्यंत थेट प्रसारित केला जाईल. या कार्यक्रमात शास्त्रीय संगीतावर आधारित कार्यक्रम होणार आहेत. सांस्कृतिक मंत्रालयाचे सचिव अरुणिश चावला आणि प्रसार भारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यांनी या कार्यक्रमाचं उद्घाटन केलं. आकाशवाणीच्या महासंचालक डॉ. प्रज्ञा पालीवाल गौर यावेळी उपस्थित होत्या.

<><><><><>

आज जागतिक पाणथळ जागा दिन आहे. अशा जागांचं संरक्षण आणि त्याबाबतची आस्था व्यक्त करण्यासाठी हा दिवस साजरा करायची प्रथा १९७१ सालापासून सुरु आहे. इराणच्या रामसर शहरात २ फेब्रुवारी १९७१ रोजी या दिवसानिमित्त पहिलं रामसर अधिवेशन झालं होतं. वनस्पती आणि इतर सूक्ष्म जीवांचा अधिवास असलेल्या जल परिसंस्था या केवळ जलसाठेच नव्हेत तर संपूर्ण पर्यावरणाला विपुल प्रमाणात पर्यावरणीय आरोग्य प्रदान करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.

आजच्या जागतिक पाणथळ दिवसानिमित्त नवी मुंबई महानगरपालिका आणि दोन सेवाभावी संस्थांच्या सहयोगानं बेलापूर विभागात सागरी किनाऱ्यावर विशेष स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. तसंच सीवूड्स इथं सर्वांनी एकत्र येऊन प्लास्टिक बंदी आणि माझी वसुंधरा अभियान अंतर्गत सामूहिक शपथ घेतली. यावेळी कापडी पिशव्यांंचं वाटप करण्यात आलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळानं ७८ व्या कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात सहभागी होण्यासाठी फिल्म बाजार-२०२५ मध्ये मराठी चित्रपटांकडून प्रवेशिका मागवल्या आहेत. १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत सेन्सॉर प्रमाणपत्र प्राप्त झालेले मराठी चित्रपट यात सहभागी व्हायला पात्र असतील.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात मध्य महाराष्ट्र, आणि मराठवाड्यात काही ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली, तर विदर्भात बऱ्याच ठिकाणी किंचित वाढ झाली. राज्यात सर्वात कमी किमान तापमान नाशिक इथं १३ पूर्णांक ४ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**